राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र , पुणे

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन – २०२३- २४

गट – माध्यमिक शिक्षक

**नवोपक्रमाचे नाव**

# “ लावू श्रवणाची गोडी, सोडवू शुद्ध शब्दांची कोडी ”


नवोपक्रमकर्त्या शिक्षकाचे नाव

**श्री. युवराज बाबा पुकळे**

**एम . ए . बी . एड .**

मोबाईल. क्र. 9021350004

Email ID : pukaleyuvraj007@gmail.com

**शाळा : स्व .शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला ,कराड .**

**केंद्र : नगरपालिका तालुका : कराड जि. सातारा**

**युडायस क्र. : 27310208803**

मार्गदर्शक

सौ . माधुरी कुलकर्णी

संस्कृत तज्ज्ञ शिक्षिका

कन्या प्रशाला ,कराड.

# नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय



| | |
|---|---|
| शिक्षकाचे नाव | : श्री . युवराज बाबा पुकळे |
| पद | : उपशिक्षक |
| शाळेचे नाव व पत्ता | : स्व शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला कराड. केंद्र – नगरपालिका ता. कराड .जि .सातारा |
| युडायस क्र. | : 27310208803 |
| मोबाईल. क्र. | : 9021350004 |
| जन्मतारीख | : 09/12/1985 |
| सेवा आरंभ दिनांक | : 05/12/2011 |
| शैक्षणिक अर्हता | : एम . ए . बी . एड . |
| सध्याचे शाळेवर नियुक्ती दि. | : 05/12/2011 |
| कायमचा पत्ता | : मंगळवार पेठ ,कराड ता. कराड जि . सातारा पिन –415110 |
| एकूण सेवा | : 12 वर्ष |
| नवोपक्रम गट क्र . | : गट क्र – 03 |
| नवोपक्रम गटाचे नाव | : माध्यमिक विभाग |
| नवोपक्रम योजलेला कालावधी | : जुलै २०२३ पासून आजतागायत ....... |

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/ डॉ. युवराज बाबा पुकळे ------ प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला "लावू श्रवणाची गोडी सोडवू शुद्ध शब्दांची कोडी" --- हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 08/11/2023

स्थळ : कराड

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव: शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

स्व. शेठ रामविलास किसनलाल लाहोटी

कन्या प्रशाला, कराड.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/ डॉ. युवराज बाबा पुकळे ------ हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला "लावू श्रवणाची गोडी, सोडवू शुद्ध शब्दांची कोडी" ------ हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 08/11/2023

स्थळ : कराड

शाळा / कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव :. सौ. हेमलता रा. जंगम

शिक्का:

मुख्याध्यापिका

स्व.शेठ रा. कि. लाहोटी कन्याप्रशाला,

कराड

अनुक्रमणिका

| अ.क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | ५ |
| २ | प्रस्तवाना | ६ – ७ |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ८ – ११ |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | १२ |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन | १३-१९ |
| ६ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | २०- २६ |
| ७ | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती | २७– २८ |
| ८ | समारोप | २८ |
| ९ | संदर्भ सूची व परिशिष्टे | २९ – ३५ |

१) नवोपक्रमाचे शीर्षक :-

# " लावू श्रवणाची गोडी,
# सोडवू शुद्ध शब्दांची कोडी "



**२) प्रस्तावना :-**

सातारासारख्या जिल्ह्यातील कराड तालुक्यातील अतिशय समृध्द भागातील निसर्गाच्या सानिध्यात कृष्णा – कोयना प्रीतीसंगामच्या काठी वसलेले कराड शहरात चारी बाजूनी निसर्गाच्या पाण्याची गंगा असलेली यशवंतराव चव्हाणानांची नगरी सांस्कृतीक , सामाजिक , राजकीय वारसा लाभलेल्या शहर म्हणजे कराड शहर या शहरात देशाचे सरंक्षण मंत्री ज्या शाळेत शिक्षण घेतलेली ती संस्था म्हणजे शिक्षण मंडळ कराड. या संस्थेची स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड. कन्या शाळा म्हणजे सुसंस्कृत , उपक्रमशील ,साताऱ्याजिल्हात नावाजलेली शाळा अशा शाळेमध्ये कोविड- 19 नंतर विद्यार्थिनींची शुद्ध लेखनाची झालेली अवस्था हे एक मोठे आव्हान उभे राहिले . मी ते आव्हान स्वीकारून विद्यार्थिनींच्या मदतीने शुद्ध लेखन सुधारण्यास सुरवात केली. इयत्ता ५ ते १० वर्ग असलेली माझी शाळा आहे अशा नावाजलेल्या शाळेत शुद्धशब्द-लेखन-शुद्ध उच्चार योग्य पद्धततीने करता आले पाहिजे .

अक्षर कसे असावे ,उच्चार कसे असावे ,ते कसे घोटवावे याचे सुरेख दर्शन रामदासस्वामींनी दासबोधच्या एकोणिसाव्या दशकात ‘शिकवणनामा’त दिले आहे .ते **“काळजीपूर्वक वाचावे अक्षर असावे हा ध्यास** लहान **वयातच लागावा,तरच अक्षर सुधारेल”** . उत्तम अक्षर हे माणसाचे व्यक्तिमत्व घडवते हे लक्षात घेणे महत्वाचे आहे .
वरील ओळीप्रमाणे जर आपण श्रवणाची गोडी विद्यार्थिनींना लावली तर शुद्ध शब्द ,शुद्धलेखन ,शुद्धउच्चार करू शकतात ,लिहू शकतात . कोविड- 19 मध्ये लेखनाचा सराव कमी झालेला कोविड नंतर शाळा व्यवस्थित सुरु झाली तेव्हा पासून विद्यार्थिनींना शुद्ध मराठी भाषेत लेखन लिहिता येत नव्हते .
आमच्या प्रशाळेमध्ये मराठी वाड्.मय मंडळ आहे या मंडळातील सर्व मराठी शिक्षकांनी शाळा म्हणजे कुटुंब आहे असे समजून श्रवणाची गोडी लावून शुद्धलेखन सुधारणासाठी प्रयत्न केले आहेत.

**“चिकाटी असावी कार्यासाठी**
**पावित्र असावे ध्येयासाठी**
**सातत्य असावे प्रयत्नासाठी**
**यशाचे मग शिखरासाठी”.**

या उक्ती प्रमाणे सर्व विद्यार्थिनींनी जर मेहनत घेतली तर सहज शक्य होणार आहे . आजपर्यंत आमच्या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर जाणाऱ्या विद्यार्थिनींची एक वेगळी ओळख निर्माण होते .
अशा शाळेमध्ये शुद्धलेखन सुधारणा झाली पाहिजे,शाळेची गुणवत्ता वाढली पाहिजे .



म्हणून शाळेतील शुद्धलेखन ,शुद्धशुब्द , शुद्धउच्चार ,शब्द संपती हे कौशल्य वाढविणे यासाठी हा नवोपक्रम हाती घेतला आहे.

### 3) नवोपक्रमाची गरज :-

शाळेतील विद्यार्थिनीची शुद्धलेखनाची कोरोना – १९ नंतर झालेली अवस्था पाहून शुद्धशब्द- शुद्धलेखन-शब्द संपत्ती हा उपक्रम हाती घेतला.

विद्यार्थिनींनी श्रवण कौशल्याची गोडी लावून भाषेतून अक्षर – शब्द- वाक्य ज्ञान वाढवून लेखन कौशल्याचा विकास करणं हा एक नवोपक्रम राबवल्यास निश्चितच विद्यार्थिनींना लाभ होईल हा विश्वास नवोउपक्रम करणाऱ्या व्यक्तीला आहे. अशुद्ध लेखनाच्या शोध घेऊन शुद्धलेखनाकडे नेण्याचा व त्यांची शब्दसंपत्ती वाढवणे हा नवोपक्रम कर्त्याचा कमी खर्चिक प्रयत्न आहे . शाळेतील ग्रंथालयातील शब्दकोश, मोबाईल इ .साधनांचा वापर कल्पकतेनुसार करून अशुद्ध शब्दलेखन सुधारणा करणे माझा प्रयत्न ........

मा. प्राचार्य फलटण डायट व माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या मार्गदर्शनासह त्या अनुषंगाने हा उपक्रम अंतर्गत कृतीचे अध्ययन- अध्यापनात शुद्धलेखन सराव करणे व भाषा पेटीचा वापर करून लेखन कौशल्य सुधारणा करण्यासाठी विविध उपक्रम शाळेत सुरू आहेत. त्या दृष्टीने सदर उपक्रम खूप उपयोगी आहे . कराड शहरातील सुंदर इमारतीमध्ये वसलेली कन्या प्रशाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थिनीची लेखनाबद्दलची समस्या जाणून घेऊन शुद्ध भाषा, शुद्धशब्द, शब्दलेखन, शब्द संपत्ती हे अध्यापनातून सुरु केले. शुद्ध शब्द- शब्दसंग्रह- शुद्ध भाषा ज्ञान दृढीकरण करून लेखन कौशल्याची विकास करण्यासाठी सदर नवोपक्रम हाती घेण्यात आला आहे. लेखन करताना विद्यार्थिनींना येणाऱ्या अडचणी सातारा जिल्ह्यातील अध्ययन क्षमता विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत हा उपक्रम राबवलेला जात आहे. लेखन करताना विद्यार्थिनींना येणाऱ्या अडचणी दूर करून मराठी भाषा विषयी प्रेम वाढवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी,

**'लावू श्रवणाची गोडी, सोडवू शुद्ध शब्दांची कोडी'** या नवोपक्रमाची निर्मिती झाली.

- **नवोपक्रमाचे वेगळेपण :-**

या उपक्रमाचे वेगळेपण असे आहे की, साधारणपणे बरेच शाळा व शालेय इमारत किंवा विद्यार्थी उपस्थिती वरती राबवतात परंतु माझा नवोपक्रम ................

१) **लेखन कौशल्य विकास** : अशुद्ध शब्द जो आहे त्याच शब्दाचा शुद्ध शब्द शब्दकोशातून पाहून शब्द लिहिणे.

२) **शब्दांचा परिपाठ** : शाळेच्या मैदानात राष्ट्रगीत प्रार्थना गीत म्हणताना शुद्ध भाषेत गाताना म्हणणे ,रोज पाच शब्द एका फळयावर लिहून प्रथम शुद्ध भाषेत श्रवण करून ऱ्हस्व-दीर्घ शब्द लिहिता येणे, हा विद्यार्थिनीमध्ये खंड पडू नये म्हणून रोज परिपाठाला पाच शब्द लिहून तो शुद्ध शब्द पाच वेळा लिहिणे.

३) **शब्दांचा सुविचार** : शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारा शेजारी फळा लावलेला आहे त्याच्यावर सुविचार रोज लिहिला जातो यातून शुद्ध शब्दांची ओळख होते .

४) **अशुद्ध शब्दांची पेटी** :- अशुद्ध शब्दांच्या पेटीमध्ये अशुद्ध शब्द लिहून विद्यार्थिनींच्या सोयीनुसार त्याच शब्द पेटीतून अशुद्ध शब्द घेऊन जातात आणि त्या आठ दिवसात शुद्ध शब्द लिहून त्याच शब्दाचे अर्थ लिहून आणून शुद्ध शब्दाच्या पेटीमध्ये टाकतात.

५) **प्रत्येक वर्गात सुभाषित पाठांतर करून घेणे** :- या विद्यार्थिनींना सुभाषिताचे शुद्ध उच्चार शिकवून त्या विद्यार्थिनींना प्रत्येक वर्गात जाऊन पाठांतर करून घेतात त्याचप्रमाणे श्रवणाची गोडी त्यांना निर्माण व्हावी म्हणून त्या ऐकून घेतात आणि मग शुद्ध भाषेमध्ये त्याचा उच्चार करतात.

६) **शिक्षकांच्या मदतीने शुद्ध शब्दांचा संग्रह पुस्तकांची निर्मिती** :- मराठी भाषेतील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत उपयोगी पडणारा शुद्ध शब्द व शब्दांचा संग्रह करून शुद्ध शब्दांच्या पुस्तकाची निर्मिती केली शिक्षकांच्या व इतर वर्गातील विद्यार्थ्यांच्या मदतीने निर्मिती केलेली आहे. यामध्ये एक १००० पेक्षा जास्त शब्दांचा संग्रह झालेले आहे.

७) **टाकाऊ वस्तूंचा वापर करून शब्दसंग्रह वाढवणे** :- टाकाऊ वस्तू जमा करून त्या वस्तूंना नाव काय आहे त्याचा उच्चार करून त्याच्यापासून फुलांच्या पाकळया बनवून त्या मध्यभागी शुद्ध शब्द लिहून त्याच्यावरती त्या शब्दाचे विविध अर्थ लिहिणे.

- **नवोपक्रमाचे महत्त्व :-**

कोविड 19-मध्ये शाळा बंद होत्या, लेखनाचा सराव नव्हता, त्यामुळे त्या विद्यार्थिनींना स्वतःचे नाव सुद्धा शुद्ध भाषेत लिहिता येत नव्हते. फळ्यावर नावे लिहीत असताना त्या खूप चुका करत होत्या. घटक चाचणी क्रमांक -१ मध्ये खूप शुद्धलेखनाच्या चुका झाल्या होत्या इयत्ता नववीच्या वर्गात फक्त १० शब्द मी फळावर लिहिण्यासाठी सांगितले होते. त्या बराच म्हणजे 50% विद्यार्थिनींनी चुकीच्या पद्धतीने शब्द लिहिले होते तेव्हा शुद्धलेखनाशिवाय दुसरा कोणताच पर्याय नव्हता,म्हणून विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपल्याला योग्य निर्णय घेऊन त्यातून वाट काढावी लागणार होती.

शिक्षणात शुद्धलेखनाची अडचण लक्षात घेऊन शुद्ध शब्द ,शुद्ध भाषा,शब्द संपत्ती हा सेतू खरंच विद्यार्थ्यांसाठी फलदायी ठरला आहे. अशुद्ध शब्दांच्या शुद्ध शब्द शोधून शुद्ध शब्दांची कोडी सोडवून अवघड वाटणारे शुद्धलेखन, अशुद्ध शब्द विद्यार्थिनींना सोपे वाटायला लागले. आपले अक्षर वळणदार व सुंदर अक्षराला शुद्धलेखनाची जोड मिळाली तर आपल्याला असे म्हणता येईल .

" **Handwrining is tha imprint of the self on the page"** .

आपण बऱ्याच ठिकाणी अशुद्ध लेखन बघतो तर कधीकधी बेशुद्ध लेखन बघतो नियम या शब्दाचा धसका न घेता लेखनातील शुद्धता समजून घेतली तर शुद्धलेखनास कोणतीही अडचण राहणार नाही असं मला वाटते म्हणून हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे भविष्यात विद्यार्थिनींचे कोणतेही वाक्य लिहीत असताना कोणतीही चूक होणार नाही आणि कोणत्याही शब्दाचा उच्चार करताना त्या सहज आणि सोप्या पद्धतीने करू शकते एवढी मी याची हमी देऊ शकतो.

या उपक्रमामुळे…

१) विद्यार्थिनींच्या शुद्धलेखनामुळे लेखन कौशल्याचा विकास होईल.

२) विद्यार्थिनींना श्रवणाची गोडी निर्माण होईल.

३) इमारती वरती. गाड्यांवरती ,भिंतीवरती लिहिलेले नावे शुद्ध लिहिले जातील.

४) अशुद्ध लेखनामुळे विद्यार्थ्यांच्या मनात असलेली भीती कमी होऊन विद्यार्थ्यांच्या मनात मराठी भाषेविषयी गोडी निर्माण होऊ शकेल.

६) मराठीत बहुतेक चुका होतात त्या ऱ्हस्व-दीर्घ व अनुस्वरांच्या या उपक्रमामुळे चुका होणार नाहीत.

७ )निपुण भारत अभियान अंतर्गत पायाभूत भाषा साक्षरता संदर्भाने विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य विकसित व्हावे आणि त्यांच्यामध्ये लेखन वाचन अभिरुची निर्माण व्हावी यासाठी सदर उपक्रम खूप उपयोगी ठरेल.

९) मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना हा उपक्रम निश्चितच उपयोगी ठरेल असा माझा विश्वास आहे.

१०) भविष्यामध्ये कधीही विद्यार्थिनीची लेखनाची व बोलत असताना  शब्दांचा उच्चार कधीच चुकणार नाही याची खात्री आहे .

**४) नवोपक्रमाची उद्दिष्टे : -**

प्रस्तुत नवोपक्रम काही उद्दिष्टे निश्चित आहेत ती पुढीलप्रमाणे .........

**१) विद्यार्थिनींना शुद्धलेखन करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे .**

**२) लेखन कौशल्य विकसित करणे .**

**३) विद्यार्थिनींना शुद्ध भाषेत लेखन करता येण्यासाठी लेखन विषयक विविध उपक्रम राबवणे .**

**४) अध्ययन अध्यापनात सहज उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक साधनाचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया कृतिशील करणे .**

**५) मराठी भाषेचे महत्व वाढवणे.**

६) एका विद्यार्थिनींकडून दुसऱ्या विद्यार्थिनीचे शुद्धलेखन सुधारणे.

७) उपयोजनात्मक पद्धतीचा वापर करून दुसऱ्या वर्गामध्ये जाऊन फळयावर शब्द देऊन त्याचा शुद्ध उच्चार करून घेणे

८) श्रवण व लेखन या कौशल्याचा विकास करून वाचनाची गोडी /आवड निर्माण करणे .

९) Do and learn सारख्या कृती मधून शब्द दृढीकरण करणे .

१०) Peer and share सारख्या तत्त्वांचा अनुभव देणे .

११)ऐकणे,बोलणे ,वाचणे ,लिहिणे या सर्व भाषिक कौशल्याच्या विकासातून लेखन कौशल्यात सकारात्मक बदल घडवणे .

१२) भाषिक कौशल्य आत्मसात करून स्वत:ची वाक्यरचना व स्वमत व्यक्त करणे .

**५) नवोपक्रमाचे नियोजन :-**

योग्य नियोजनावर कोणत्याही कार्याची यशस्विता अवलंबून असते म्हणून माझे नियोजन पुढीलप्रमाणे केले .

**अ) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण : -**

माझ्या शाळेतील ६० विद्यार्थिनींनी पैकी फक्त एक दोन विद्यार्थिनींना सोडता, बाकीच्या सर्व विद्यार्थिनींनी मराठी शब्द शुद्ध लिहिता येत नव्हते. अपरिचित मराठी शुद्ध शब्द लिहिता येत नसल्यामुळे अध्यापनाच्या वेळी लेखनात सांगितल्यावर बऱ्याच विद्यार्थिनींनी बेंच खाली वही धरून लिखाण करत होत्या,अध्ययन-अध्यापन विद्यार्थी शिक्षक परिणामकारक आंतरक्रिया होत नव्हती.लेखनाची क्रिया मंदावली होती लेखनाचा पाया मजबूत करणे गरजेचे होते.

**ब) संबंधित व्यक्तीशी चर्चा व तज्ञांशी चर्चा :-**

या समस्येबाबत सर्वप्रथम मी आमच्या प्रशालेतील उपमुख्याध्यापिका मराठी विषयाच्या प्रमुख सौ . सामक बाई आणि संस्कृत विषयाच्या तज्ज्ञ शिक्षिका सौ . कुलकर्णी बाई यांच्यासोबत विद्यार्थिनींची शुद्धलेखनाबाबतची सुस्थिती लक्षात आणून देऊन लेखन कौशल्या बाबतीत चर्चा केली. सातारा जिल्हा शिक्षण अधिव्याख्याता व प्रशिक्षण संस्था फलटण येथील मार्गदर्शन अधिव्याख्याता सौ. माळी मॅडम यांनी प्रशिक्षणाच्या वेळी कोण कोणते उपक्रम तयार करता येतील याबाबत चर्चा केली. विद्यार्थिनींना अशुद्ध लेखनाकडून शुद्धलेखनाकडे पोहोचवता येईल. काही प्रमाणात भाषिककोडी व उपक्रमाचे आयोजन करून मुलींना लेखन, वाचन शिकवता येईल असे मला सुचवले. शुद्ध शब्दाच्या कोड्यामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळेल आणि त्यामुळे शब्दसंपत्ती वाढेल असा विश्वासही दिला . आमच्या प्रशालेतील संस्कृत तज्ज्ञ शिक्षिका सौ. कुलकर्णी बाई यांनी मुलींच्या प्रगतीत अडसर ठरलेली लेखन समस्या बाबत यातून मार्ग कसा काढायचा याबाबत चर्चा व मार्गदर्शन केले. अशुद्ध लेखनाची अवस्था पाहून पर्यायी व्यवस्था करून शुद्धलेखन प्रक्रिया सुरू ठेवावी याबाबत मार्गदर्शन केले.

**क) आवश्यक साधनांची निर्मिती व वापर :-**


तज्ज्ञांशी चर्चा करून हा नवोपक्रम सुरु करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचा विकास जाणून घेण्यासाठी 20 गुणांची पूर्व चाचणी तयार करण्यात आली ८ उपक्रम राबवल्यानंतर विद्यार्थिनींना आवर्तनाची गरज आहे किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठी पदनिश्चयन श्रेणी निर्मिती केली नवोपक्रम किती प्रमाणात यशस्वी झाला आहे, हे पडताळून पाहण्यासाठी अंतिम चाचणी तयार केली.

पूर्व चाचणी, पदनिश्चयन श्रेणी ,अंतिम चाचणी तयार झाल्यानंतर तज्ञाद्वारे तपासून घेण्यात आली विद्यार्थिनीचे लेखन कौशल्य वाढवण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करून नियोजन करण्यात आले त्यासाठी साधनांचा आधार घेण्यात आला यात विद्यार्थाच्या आर्थिक ,सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीचा विचार करण्यात आला .

१) टाकाऊ वस्तु गोळा करून त्याच्यावरती अशुद्ध शब्द लिहिले व त्याच्या दुसऱ्या बाजूला शुद्ध शब्द लिहून त्या शब्दाचे अनेक अर्थ लिहित  वैशिष्ट्यपूर्ण असे साधन तयार केले .

२) वर्गातील फळयावरती रोज पाच शब्द लिहून दिली त्यामुळे विद्यार्थिनींची शब्दसंपत्ती वाढली.

**३) शब्दसंग्रहाची पेटी :-**




वैशिष्ट्यपूर्ण अशी शब्दसंग्रहाची  पेटी बनवलेली होती. एक शुद्ध शब्दांची पेटी व दुसरी अशुद्ध शब्दांची पेटी तयार केली होती. अशुद्ध शब्दांच्या पेटीतील तो अशुद्ध शब्द घेऊन तो शब्द शुद्ध लिहून आठ दिवसांमध्ये शब्दकोश internet/ online पद्धतीचा इ. साधनाचा वापर करून त्या शब्दाचा शुद्ध शब्द आणि त्या शब्दाचे अनेक अर्थ शोधून त्या पेटीमध्ये शुद्ध शब्दांच्या पेटीमध्ये आणून तो शब्द टाकला जात असे.

४)भाषिक खेळ यासाठी शुद्ध शब्दांची कोडी एकूण पट संख्या – ६५ प्रमाणे

५) शुद्धलेखनाचे नियम :- ०५

इयत्ता एक ते आठ,आठ ते दहा ,दहा ते अठरा नियम इत्यादी तयार करून वर्गामध्ये ते लावण्यात आले.

६) शुद्धलेखनासाठी मराठीतील शुद्ध शब्द संग्रहाची निर्मिती.

७) शुद्ध शब्द आणि त्या  शब्दांचे अनेक अर्थ संग्रहाची एक छोटीश्या पुस्तकाची निर्मिती.

८) प्रत्येक वर्गात भगवद्गीतेतील सुभाषित पाठांतर व गायन उच्चार करणे.

९) दोन- दोन विद्यार्थिनीचे गट करून प्रत्येक वर्गात जाऊन पाच शब्द फळयावर ते लिहून त्या शब्दाचा शुद्ध शब्द उच्चार करून घेणे.

१०) विद्यार्थ्यांना हसत खेळत मनोरंजनात्मक कृतीतून व कौशल्य युक्त संस्कारक्षम शिक्षण कसे देता येईल याचा विचार केला.

११) नवोपक्रमातील विविध साधने बनवण्यासाठी लागणाऱ्या वस्तू उदाहरणार्थ .टिंटेड पेपर, कार्डशीट ,पेपर मार्कर पेन, टाकाऊ ग्लास,रंगीत कागद, खोड रबर ,डिंक इत्यादी गोष्टींची यादी तयार केली .

**ड) करावयाच्या कृतीचा क्रम : -**

नवोपक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्ग निवडणे, विद्यार्थ्यांना कल्पना देणे ,आवश्यक साहित्य आणणे , दिनांक वेळ निश्चित करणे, मार्गदर्शन निश्चित करणे, वापरण्याचे तंत्रे निश्चित करणे, प्रत्यक्ष उपक्रम राबवणे व मूल्यमापनाद्वारे यशस्विता तपासणे हा कृतीचा क्रम निश्चित केला.

१) प्रथम फळयावर विद्यार्थ्याच्या चुकांचे निरीक्षण केले.

२) ज्या शब्दात नेहमी चुका होतात असे ४/५ शब्द रोज ५ वेळा लिहावयास सांगणे.

३) उपक्रम पूर्व चाचणी विद्यार्थिनीकडून सोडवून घेतली.

४) उपक्रम व चाचणी निष्कर्ष काढले .

५) पालकांशी उपक्रम संदर्भात संवाद साधला .

६) माध्यमिक स्तरावरील घ्यावयाच्या कृती निश्चित केल्या.

७) कृतीची अंमलबजावणी विद्यार्थ्यांसाठी शुद्धलेखन कौशल्य
वाढवण्यासाठी सोप्या असणाऱ्या उपक्रमाची यादी बनवली.


८) उपक्रमोत्तर चाचणी सोडून घेतली .

९) उपक्रमोत्तर चाचणीद्वारे निष्कर्ष काढून घेतले.



**इ) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण : -**

सदर नवोपक्रम राबवल्या नंतर त्याचे खूप सकारात्मक परिणाम दिसू लागले. प्रमाण भाषेतून शिक्षणामुळे विद्यार्थी अध्ययन- अध्यापन प्रक्रियेत मोठ्या आनंदाने सहभागी होऊ लागले. आपण ही शिकू शकतो. चांगले, शुद्ध लिहू शकतो असा आत्मविश्वास विद्यार्थिनींमध्ये निर्माण झाला. विद्यार्थिनी मराठीतील अक्षरे ,शब्द शुद्ध भाषेत लिहू लागल्या. मराठी भाषा वाचन- शुद्धलेखन योग्य प्रकारे करणे हेच नवोपक्रमाचे मोठे फलित आहे . शुद्ध शब्दलेखन विषयक विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थिनींना स्वयं अध्ययनास प्रवृत्ती करून आवड निर्माण झाली रोज नवीन शब्द शोधून विद्यार्थिनी त्यातील आनंदाने चुका शोधून शुद्धलेखन सुधारू लागल्या.




**ई) कारवाईचे टप्पे व (वेळापत्रक) : -**

**"लावू श्रवणाची गोडी सोडवू शुद्धलेखनाची कोडी"** हा नवोउपक्रम स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशालेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शाळेतील विद्यार्थिनीच्या प्रमाण भाषेतील लेखन कौशल्य वाढवण्याकरता राबवण्यात आला या नवोउपक्रमामध्ये इयत्ता आठवी ते नववी चे 30 विद्यार्थिनींनी सहभागी झाल्या होत्या यासाठी खालील कृतींचा नवोउपक्रमात समावेश करण्यात आला होता.

| अनु क्र. | कालावधी | करावयाची कृती |
|---|---|---|
| १ | दि.२५जुलै ते दि.०३ऑगस्ट | नवोपक्रम नियोजन ,तज्ज्ञांशी चर्चा , आवश्यक साधनांची निर्मिती |
| २ | दि.०४ ऑगस्ट | पूर्व चाचणी विद्यार्थिनी प्रतिसाद |
| ३ | दि.०५ऑगस्ट ते ५ नोव्हेंबर | प्रत्यक्ष उपक्रम अंमलबजावणी |
| ४ | दि.०६नोव्हेंबर | पदनिश्चयन श्रेणीद्वारे विद्यार्थिनी प्रतिसाद तपासणी |
| ५ | दि.७ नोव्हेंबर | अंतिम चाचणी |
| ६ | दि . ८ नोव्हेंबर ते दि.२५ नोव्हेंबर | नवोपक्रम अहवाल लेखन |

**विद्यार्थ्यांची लेखन कौशल्य वाढविण्यासाठी विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची यादी**

| अ.क्र . | उपक्रम | वापरण्याचे साहित्य | कृती | निकष |
|---|---|---|---|---|
| १ | चला शुद्ध शब्द ओळखू या. | शब्द कार्ड | शब्द कार्ड उचलून शुद्ध शब्द ओळखणे . | शब्द ज्ञान वाढवणे |
| २ | अशुद्ध शब्द ओळखू या. | अशुद्ध शब्द बॉक्स पेटी | अशुद्ध शब्द बॉक्स पेटीतील एक शब्द घेऊन तो शब्द शुद्ध फळयावर लिहिणे . | लेखन सराव |
| ३ | शुद्ध शब्द ओळखू या. | शुद्ध शब्द बॉक्स पेटी | शुद्ध शब्द बॉक्स पेटीतील एक शब्द घेऊन त्या शब्दाचा फळयावर अर्थ लिहिणे . | स्मरण शक्ती वाढवणे |
| ४ | शब्दनिर्मिती करू या . | कार्ड शीट, मार्कर पेन . | शब्द तयार करणे . | शब्द संपती वाढविणे . |
| ५ | शब्द कोडी सोडवूया ? | कार्ड शीट, रंगीत कागद ,मार्कर पेन . | शुद्ध शब्दांची कोडी तयार करून सोडवणे . | बुद्धीला चालना |
| ६ | उच्चारातील फरक ओळखू या . | अक्षर – शब्द कार्ड | शब्दाचा उच्चार भेद ओळखणे ऱ्हस्व दीर्घ यातीलफरक ओळखणे. | शब्द संपती वाढवणे |
| ७ | शुद्ध शब्दपट्ट्या वाचू या . | शब्दपट्ट्या | शुद्ध शब्दपट्ट्याचे वाचन करणे . | वाचन सराव |
| ८ | रोज ५ शब्द लिहू या. | फळा व खडू | रोज फळयावर ५ शब्द लिहून देणे | लेखन सराव |
| ९ | सुभाषित पाठांतर करू या . | छोटी भागवत गीता | रोज वर्गात पहिल्या तासाला सुभाषित पाठांतर करून घेणे . | उच्चार सराव |
| १० | सुविचार लेखन करू या . | फळा व खडू | शाळेच्या मुख्य गेट वर असलेल्या फळयावर सुविचार लेखन करणे . | लेखन सराव |
| ११ | शब्दकोशचा वापर करू या . | मराठी शब्दकोश | मराठी शब्दकोशतील शब्दांचे अर्थ शोधणे. | शब्द संपती वाढवणे |

**ए) उपक्रमासाठी इतरांची मदत :-**

उपक्रमसंदर्भात कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. हेमलता जंगम मॅडम उपमुख्याध्यापिका सौ. सामक बाई संस्कृत तज्ञ शिक्षिका विजापुरे बाई यांची बहुमोलाची मदत झाली. सावित्रीबाई डी .एड. कॉलेज सातारा चे प्राध्यापक श्री. भोसले सर शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य,माता पालक संघ व सर्व पालक यांचे सहकार्य लाभले.

**ऐ) उपक्रमासाठी सादर करायचे पुरावे : -**

१) सदर नवोपक्रमातील उपक्रमाचे व्हिडिओ युट्युबवर प्रसारित केले आहे त्याची लिंक खाली दिलेली आहे.

https://youtu.be/Enwwywwn71Y?feature=shared

२) स्वनिर्मित प्रमाण भाषेतील मराठी पुस्तकाची शुद्ध शब्दांचा संग्रह अक्षरांची पुस्तिका आहे.

३) निसर्गाच्या सानिध्यातील कन्या प्रशाला कराड या प्रशालेतील विविध वर्गामध्ये जाऊन शब्दांचे उच्चार शिकवताना.



फोटो / लिंक

४) शब्दकोडी तयार करताना जो अशुद्ध शब्द आहे तो शोधताना

- चला शुद्धलेखन सुधारूया.
- शुद्धलेखनाचे नियम जाणून घेऊया.
- शब्दसंग्रह वाढवूया.
- चला शब्द कोणी सोडू या.

कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, शिक्षक प्रेमी व पालकांचे अभिप्राय प्रस्तुत नवोपक्रमासाठी शाळेतील विद्यार्थ्यांचे एकत्रित व उत्तर चाचणीचा निकाल यांचे शेकडा प्रमाण व त्यातील फरकावरून नवोपक्रमाची यशस्विता मांडण्याचे ठरविले आहे . सोबत शिक्षक विद्यार्थ्यांचे फोटो व व्हिडिओ सादर करण्याचे ठरविले आहे.






**६) नवोपक्रमाचे कार्यपद्धती :-**

**अ) पूर्व स्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी : -**माझ्या शाळेत मराठी प्रमाण भाषा प्रामुख्याने बोलली जाते माझ्या शाळेतील सर्वच वर्गात मराठी अशुद्ध लेखन लिहिले जात होते. विद्यार्थिनी मधील असणाऱ्या पूर्व ज्ञानाची स्थिती तपासण्यासाठी घेण्यात आलेली पूर्व चाचणीचे मूल्यमापन करण्यासाठी माझ्या शाळेतील विद्यार्थिनींना शुद्ध शब्द लेखन किती प्रमाण येते हे तपासण्यासाठी पूर्व चाचणी घेतलेली आहे.

**पूर्व चाचणीचे मूल्यमापन**

| **अ.क्र.** | विद्यार्थिनींचे नाव | **इयत्ता** | २० **पैकी गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १ | कु. अडसुळे यशश्री अच्युत | इ. ९ वी | १२ | ६० |
| २ | कु. चव्हाण मैथिली मिलिंद | इ. ९ वी | १५ | ७५ |
| ३ | कु. चोरगे धनश्री प्रकाश | इ. ९ वी | १६ | ६० |
| ४ | कु. गवते मुग्धा सुजित | इ. ९ वी | १३ | ६५ |
| ५ | कु. घोडके माधवी विवेक | इ. ९ वी | १० | ५० |
| ६ | कु. हिवरे अनुष्का उमेश | इ. ९ वी | १२ | ६० |
| ७ | कु. जाधव गिरीजा संजय | इ. ९ वी | १३ | ६५ |
| ८ | कु. जगदाळे अदिती अशोक | इ. ९ वी | १५ | ७५ |
| ९ | कु. कदम तन्वी महेश | इ. ९ वी | ११ | ५५ |
| १० | कु. कापरे समिक्षा नितीन | इ. ९ वी | १४ | ७० |
| ११ | कु. करंदीकर प्राची अवधूत | इ. ९ वी | १५ | ७५ |
| १२ | कु. काटवटे मुग्धा सुधीर | इ. ९ वी | १३ | ६५ |
| १३ | कु. कुंभार कस्तुरी प्रशांत | इ. ९ वी | १४ | ७० |
| १४ | कु. कुंभार त्रिशा उदय | इ. ९ वी | १४ | ७० |
| १५ | कु. माळी पियुषा उध्दव | इ. ९ वी | १३ | ६५ |
| १६ | कु. माने अदिती अभिजित | इ. ९ वी | १४ | ७० |
| १७ | कु. माने साक्षी प्रताप | इ. ९ वी | १३ | ६५ |
| १८ | कु. पाटील दर्शना प्रशांत | इ. ९ वी | १४ | ७० |
| १९ | कु. पाटील ज्ञानेश्वरी अतुल | इ. ९ वी | १२ | ६० |
| २० | कु. पाटील प्रांजली प्रकाश | इ. ९ वी | १५ | ७५ |
| २१ | कु. पाटील श्रध्दा अमित | इ. ९ वी | १४ | ७० |
| २२ | कु. पवार दुर्गा दिपक | इ. ९ वी | ११ | ५५ |
| २३ | कु.पोळ सानवी शशिकांत | इ. ९ वी | १३ | ६५ |
| २४ | कु. रेडेकर वैष्णवी विनोद | इ. ९ वी | १४ | ७० |
| २५ | कु. शेटे अदिती चंद्रशेखर | इ. ९ वी | १३ | ६५ |
| २६ | कु. सूर्यवंशी प्रज्ञा हेमंत | इ. ९ वी | १६ | ६० |
| २७ | कु. तावरे इंद्रायणी परशुराम | इ. ९ वी | १३ | ६५ |
| २८ | कु. वळंजू समृध्दी सचिन | इ. ९ वी | १२ | ६० |
| २९ | कु. वरेकर अदिती सुनिल | इ. ९ वी | १२ | ६० |
| ३० | कु. यादव प्रगती विकासकुमार | इ. ९ वी | १४ | ७० |

**ब)कारवाईच्या दरम्याने केलेली निरीक्षणे व माहिती संकलन : -**

आमच्या प्रशालेमधील प्रत्येक विद्यार्थिनीची शुद्धलेखनाची व वर्गातील अवस्था पाहून प्रत्येक दिवशी पाच शब्द शुद्ध लिहिण्यास सुरुवात केली. वर्गात शुद्ध शब्द ऐकण्याची सवय लागली विद्यार्थिनींना या उपक्रमामुळे आपुलकी वाटायला लागली.त्यामुळे भाषेच्या अध्ययन-अध्यापन अंतर्गत विद्यार्थिनींनी आनंदाने सहभाग घेऊन  रोज आनंदाने शब्द लिहू लागल्या.

शब्दकोशाची खूप मदत झाली. आपणही शुद्ध शब्द लिहू शकतो, शुद्ध बोलू शकतो असा आत्मविश्वास विदयार्थिनी मध्ये निर्माण झाला मुली लिहिता झाल्या मुली बोलत्या झाल्या. रंगीत दोन बॉक्स मधील अशुद्ध शब्द ठेवल्यामुळे त्या विद्यार्थिनी घेऊन जात असल्यामुळे त्यामध्ये मोबाईल ,शब्दकोशाचा इ साधनाचा वापर करत होत्या. त्यांना नवीन शब्दाचा परिचय होत होता. या लेखन उपक्रमामुळे विद्यार्थिनींना व पालकांना व शाळेला व शिक्षक विषयी विशेष आपुलकी वाटायला लागली.

**"लावू श्रवणाची गोडी सोडवू शकतो शब्दांची कोडी "**

**क) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी -**

विद्यार्थिनींना उपक्रम पूर्ण झाल्यावर आपण एक अशक्य वाटणारी गोष्ट पूर्ण केली याची अनुभूती आली. कारण मराठी भाषेतील शब्द वाक्य लेखन करणे ही विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून अत्यंत कठीण समजली जाणारी बाब आपण स्वतः करू शकतो हे त्यांच्या लक्षात आलं. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये मराठी भाषेची अशुद्ध लेखनाची असलेली भीती कमी झाली. विद्यार्थी प्रमाण भाषेतील अक्षर शब्द शुद्ध लिहू लागली विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

आपण मोबाईल, शब्दकोश यांच्या मदतीने अनेक गोष्टी शिकू लागल्या. इतरापेक्षा आपल्याला वेगळे ज्ञान मिळालं तसेच आपण शुद्ध लिहू लागलो तर शुद्ध वाचू शकतो याचा आनंद विद्यार्थिनींना मिळाला मराठी भाषेत लिहिणारे व वाचणारे पाल्य बघून पालकांना शाळा व शिक्षका विषयी अभिमान वाटायला लागला.उपक्रम पूर्ण झाल्यावर घेण्यात आलेली उत्तर चाचणीमध्ये मिळालेले गुण उपक्रमाची यशस्वितेचा आलेख दर्शवतो. आता मी मराठीतून शुद्ध शब्द लिहून शब्दांचे उच्चार करू शकते असा मनोमन विद्यार्थिनीमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला .

**नवोपक्रम पूर्ण झाल्यावर घेण्यात आलेली उत्तर चाचणीचे मूल्यमापन ................**

| अ.क्र. | विद्यार्थिनींचे नाव | इयत्ता | २० पैकी गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कु. अडसुळे यशश्री अच्युत | इ. ९ वी | २० | १०० |
| २ | कु. चव्हाण मैथिली मिलिंद | इ. ९ वी | २० | १०० |
| ३ | कु. चोरगे धनश्री प्रकाश | इ. ९ वी | २० | १०० |
| ४ | कु. गवते मुग्धा सुजित | इ. ९ वी | २० | १०० |
| ५ | कु. घोडके माधवी विवेक | इ. ९ वी | २० | १०० |
| ६ | कु. हिवरे अनुष्का उमेश | इ. ९ वी | २० | १०० |
| ७ | कु. जाधव गिरीजा संजय | इ. ९ वी | १९ | ९५ |
| ८ | कु. जगदाळे अदिती अशोक | इ. ९ वी | २० | १०० |
| ९ | कु.कदम तन्वी महेश | इ. ९ वी | २० | १०० |
| १० | कु. कापरे समिक्षा नितीन | इ. ९ वी | २० | १०० |
| ११ | कु. करंदीकर प्राची अवधूत | इ. ९ वी | २० | १०० |
| १२ | कु. काटवटे मुग्धा सुधीर | इ. ९ वी | २० | १०० |
| १३ | कु. कुंभार कस्तुरी प्रशांत | इ. ९ वी | २० | १०० |
| १४ | कु. कुंभार त्रिशा उदय | इ. ९ वी | २० | १०० |
| १५ | कु. माळी पियुषा उध्दव | इ. ९ वी | १९ | ९५ |
| १६ | कु. माने अदिती अभिजित | इ. ९ वी | २० | १०० |
| १७ | कु. माने साक्षी प्रताप | इ. ९ वी | २० | १०० |
| १८ | कु. पाटील दर्शना प्रशांत | इ. ९ वी | २० | १०० |
| १९ | कु. पाटील ज्ञानेश्वरी अतुल | इ. ९ वी | १८ | ९० |
| २० | कु. पाटील प्रांजली प्रकाश | इ. ९ वी | २० | १०० |
| २१ | कु. पाटील श्रध्दा अमित | इ. ९ वी | १९ | ९५ |
| २२ | कु. पवार दुर्गा दिपक | इ. ९ वी | २० | १०० |
| २३ | कु.पोळ सानवी शशिकांत | इ. ९ वी | २० | १०० |
| २४ | कु. रेडेकर वैष्णवी विनोद | इ. ९ वी | २० | १०० |
| २५ | कु. शेटे अदिती चंद्रशेखर | इ. ९ वी | २० | १०० |
| २६ | कु. सूर्यवंशी प्रज्ञा हेमंत | इ. ९ वी | २० | १०० |
| २७ | कु. तावरे इंद्रायणी परशुराम | इ. ९ वी | २० | १०० |
| २८ | कु. वळंजू समृध्दी सचिन | इ. ९ वी | २० | १०० |
| २९ | कु. वरेकर अदिती सुनिल | इ. ९ वी | २० | १०० |
| ३० | कु. यादव प्रगती विकासकुमार | इ. ९ वी | २० | १०० |

उत्तर चाचणीतील गुणावरून लक्षात येते की, हा उपक्रम विद्यार्थिनींच्या प्रमाण भाषेतील शुद्ध शब्द लेखन कौशल्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरला आहे.सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक झाले या गोष्टी शिक्षकांना आनंद देणाऱ्या आहेत. या उपक्रमाबाबत सर्व पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक बनला. ,शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका,शाळेतील सर्व शिक्षक यांनी सर्वांनी कौतुकाची थाप दिली.

**ड) कारवाई करताना आलेल्या अडचणी :-**

नक्कीच हा उपक्रम राबविताना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागले.

१) सुरुवातीला आमच्या मुली लिहिता येत, नाही वाचन व्यवस्थित करत नाही, मला त्यांची खूप मोठी भीती होती फळयावरती सुविचार लिहायचा झाला तरी शुद्धलेखनामुळे मनात भीती असल्यामुळे शाळेच्या फळयावरती सुविचार असेल सुभाषित असेल ते लिहिण्यासाठी नकार देत होत्या,परंतु नंतर त्यांनी लिहायला सुरुवात केली.

२) कोरोना  महामारीमुळे जवळ जवळ पास दोन ते तीन वर्ष शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लेखनाकडे खूप दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे त्यांचे शब्द लेखन शब्द उच्चार त्या ठिकाणी व्यवस्थित करता येत नव्हते हा उपक्रम राबवताना सदर विद्यार्थिनी सक्रिय होऊ लागल्या.

३) नवोपक्रमाची कारवाई करताना सुरुवातीला काही विद्यार्थिनी 5 शब्द लिहिण्यास तयार होत नव्हत्या, लेखन लिहीत नव्हत्या, लेखन लिहिता येत नसल्यामुळे बघायची भूमिका घेत होत्या .

४) नवोपक्रम योजना लागणारे साधन काय करावे हे कळत नव्हते.

५) काही विद्यार्थिनीच्या आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने सर्व पुरेश शैक्षणिक साहित्य उपलब्ध नव्हते .चार्ट, मार्कर पेन , कार्डशीट इ यांचे वाटप करण्यात आले.

६) आठवड्यातून शुद्ध शब्द लिहिण्यासाठी घेतलेला त्या काळजीपूर्वक लिहून बॉक्समध्ये ठेवतात का नाही ते पाहावे लागत होते.


७) भाषिक क्षमता व भाषा समृद्धता यासाठी पूरक लेखन सामग्री विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होण्यात अडथळा होता. मुलींना सहजपणे लेखन करता येईल किंवा लेखन गोडी वाढेल असे उपयुक्त आणि आकर्षक असे शुद्धलेखन लाहोटी कन्या प्रशालेमध्ये हा उपक्रम सुरू करण्यात आला.

८)माझ्या रोजच्या तासिकाबरोबर या जादा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसाठी सतत वेळेचे नियोजन व अधिकाऱ्यांशी ,पालकांशी ,सहकारी शिक्षकांची सुसंवाद साधावा लागेल ,


**इ) माहितीचे विश्लेषण आलेख तक्ते :-**

या नवोपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची अंतरक्रिया योग्य प्रकारे साधली गेली, मुक्त व आनंद पूर्ण वातावरणात मुलींनी शिक्षणाची अनुभूती घेतली, त्यातून अपेक्षित उदिष्टे साध्य झाली व गुणात्मक पातळी वाढ झाली. किमान संपादणूक व क्षमता साध्य करण्यात यश प्राप्त झाले. नवोपक्रमाच्या सुरुवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली. यात विद्यार्थी क्षमता कौशल्य आणि वर्तन यांचा निरीक्षण करून योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. उपक्रमानंतर समांतर उत्तर चाचणी घेतली. मुलींमधील समाधानकारक बदल व प्रगती व त्यांचा आलेख दृष्टीक्षेपात आला. याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित पायाभूत क्षमता, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यात यश प्राप्त झाले. खालील आलेख व तक्त्याद्वारे दर्शवण्यात आलेले आहे.


**इयत्ता नववी पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थिनिहाय गुणातील फरक दर्शविणारा आलेख**



**इयत्ता नववी पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थिनिहाय  गुणातील फरक दर्शविणारा आलेख**




**इयत्ता नववी पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थिनिहाय  गुणातील फरक दर्शविणारा आलेख**




मूल्यमापनासाठी वापरलेली तंत्रे

लेखी काम

निरीक्षण

प्रात्यक्षिक तोंडी

मूल्यमापनासाठी वापरलेली साधने

पूर्व व उत्तर चाचणी

पदनिश्चयन श्रेणी

**उपक्रम पूर्ण झाल्यावर खालील प्रमाणे निरीक्षण नोंदवण्यात आले**

| अ.क्र. | **विद्यार्थिनींचे नाव** | **अपेक्षत उदिदष्टे** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक स्तर | | अक्षर | | शब्द | | वाक्य | |
| | | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर |
| १ | कु. अडसुळे यशश्री अच्युत | ✓ | | | | | ✓ | | |
| २ | कु. चव्हाण मैथिली मिलिंद | ✓ | | ✓ | | ✓ | | | |
| ३ | कु. चोरगे धनश्री प्रकाश | ✓ | | ✓ | | | ✓ | | |
| ४ | कु. गवते मुग्धा सुजित | ✓ | | | | ✓ | | | |
| ५ | कु. घोडके माधवी विवेक | ✓ | | | | | | ✓ | |
| ६ | कु. हिवरे अनुष्का उमेश | ✓ | | ✓ | | | ✓ | | |
| ७ | कु. जाधव गिरीजा संजय | ✓ | | | | ✓ | | | |
| ८ | कु. जगदाळे अदिती अशोक | ✓ | | | ✓ | | | ✓ | |
| ९ | कु.कदम तन्वी महेश | ✓ | | ✓ | | ✓ | | | |
| १० | कु. कापरे समिक्षा नितीन | | | ✓ | | | ✓ | | |
| ११ | कु. करंदीकर प्राची अवधूत | ✓ | | ✓ | | | | ✓ | |
| १२ | कु. काटवटे मुग्धा सुधीर | ✓ | | | ✓ | | | | |
| १३ | कु. कुंभार कस्तुरी प्रशांत | ✓ | | | ✓ | | | ✓ | |
| १४ | कु. कुंभार त्रिशा उदय | ✓ | | | ✓ | ✓ | | | |
| १५ | कु. माळी पियुषा उध्दव | ✓ | | ✓ | | | ✓ | | |
| १६ | कु. माने अदिती अभिजित | ✓ | | | ✓ | | | | |
| १७ | कु. माने साक्षी प्रताप | ✓ | | ✓ | | | ✓ | | |
| १८ | कु. पाटील दर्शना प्रशांत | ✓ | | | ✓ | | | ✓ | |
| १९ | कु. पाटील ज्ञानेश्वरी अतुल | ✓ | | ✓ | | | | | ✓ |
| २० | कु. पाटील प्रांजली प्रकाश | ✓ | | ✓ | | ✓ | | | |
| २१ | कु. पाटील श्रध्दा अमित | ✓ | | | | | | ✓ | |
| २२ | कु. पवार दुर्गा दिपक | ✓ | | | | | | | |
| २३ | कु.पोळ सानवी शशिकांत | ✓ | | | | ✓ | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | कु. रेडेकर वैष्णवी विनोद | ✓ | | | ✓ | | ✓ | | ✓ |
| २५ | कु. शेटे अदिती चंद्रशेखर | ✓ | | | ✓ | | | ✓ | |
| २६ | कु. सूर्यवंशी प्रज्ञा हेमंत | ✓ | | ✓ | | | ✓ | | ✓ |
| २७ | कु. तावरे इंद्रायणी परशुराम | ✓ | | | ✓ | | | | |
| २८ | कु. वळंजू समृध्दी सचिन | ✓ | | ✓ | | | ✓ | | |
| २९ | कु. वरेकर अदिती सुनिल | ✓ | | ✓ | | ✓ | | | |
| ३० | कु. यादव प्रगती विकासकुमार | ✓ | | | ✓ | | | ✓ | |
| | | | | | | | | | |

**अक्षर स्तरावर = २३** **शुद्ध शब्दस्तरावर= १७** **वाक्यस्तरावर =११**

**७) नवोउपक्रमाची यशस्विता :-**

नवोपक्रम कर्त्याने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्व चाचणी व उतर चाचणीतील गुणांवरून कितपत साध्य केले आहेत ते लगेच आपल्या लक्षात येते. यावरून नवोउपक्रमाची यशस्विता खालील प्रमाणे आहे .

१) पूर्व चाचणीद्वारे विद्यार्थिनीचे शुद्ध शब्दलेखन संदर्भात समस्याचा शोध घेतला असता त्यावरून नवोपक्रमाची रूपरेखा ठरवण्यात पूर्वचाचणी उपयुक्त ठरली . विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थिनींना लेखन करताना येणाऱ्या समस्या दूर करण्यात आल्या.

२) सर्व विद्यार्थ्यांनी प्रमाण भाषेतून शुद्ध भाषेत लेखन करू लागली.

३) विद्यार्थिनींना लेखन करता येण्यासाठी लेखन विकसनासाठी उपक्रम अंमलबजावणी अतिशय उपयुक्त ठरला आहे.

४) अध्ययन अध्यापनात परिस्थितीनुसार सहज उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक साधनांचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया कृतीशील झाली.

५) विद्यार्थिनींनी आनंदाने आवडीने इतर वर्गावरती जाऊन शुद्ध उच्चार, शुद्ध शब्द लिहिण्यास सांगू लागल्या व त्यामुळे त्यांनाही आनंद वाटू लागला.

६) मराठी शब्द संग्रह त्यांचा वाढला ज्या शब्दाचा अर्थ माहित नव्हता. त्यामुळे अनेक शब्दांच्या अर्थ विद्यार्थिनींना माहित झाले.

७) शाळेमध्ये बोलत असताना मराठी व्याकरणाचा उपयोग करून बोलू लागल्या.

८) इयत्ता नववी वर्गातील सर्व विद्यार्थिनींच्या शुद्धलेखनातील चुकाची सुधारणा झाली.

९) शाळेत परिपाठाला न विसरता सर्व मुली पाच शब्द लिहून त्या शब्दांचे उच्चार करून घेतल्यामुळे शाळेतील सर्वं मुलींचे शुद्ध शब्दलेखन सुधारले.

१०) सदर नवोपक्रमामुळे शाळेतील व शाळेबाहेरील ज्या ठिकाणी जे शब्द अशुद्ध लिहिले आहेत त्यांच्यावरती लक्ष वेधून लागले .जवळजवळ सर्व शाळेतील विद्यार्थिनींना, शिक्षकांना ही या बाबत नवचैतन्य देणारा नवोपक्रम मार्गदर्शक ठरला सर्वांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला .अधिकारी पदाधिकारी व शिक्षण प्रेमींनी सदिच्छा भेट देऊन नवोपक्रम पाहून कौतुक केले.

**८) समारोप : -**

शाळेचे कराड शहरातील संस्कार अमृत असलेली कन्या प्रशाला मराठी शुद्ध शब्दलेखन लिहिता येत नव्हते. अक्षर शब्द वाक्य नीट लिहिता येत नव्हते म्हणून मी लेखन कौशल्याशी निगडित उपक्रम निर्मिती करून तो राबवण्याचा ठरवलं. शाळेमध्ये श्रवणाची गोडी लावून शुद्धलेखन व शब्दकोडे सोडवणे यांचा ज्ञान वाढवून लेखन कौशल्य विकसित करणे. हा नवोपक्रम विषयी निवडला हेच या नवोपक्रमाचे वेगळेपण आहे. राज्यातील सर्व शाळेत मराठी ही आपली मातृभाषा आहे ती आपल्याला जपली पाहिजे तिचं महत्त्व वाढवलं पाहिजे, त्यासाठी हा उपक्रम राबवणे बिन खर्चिक नवोपक्रम नक्कीच उपयुक्त व पारदर्शी ठरू शकतो अशा माझा विश्वास आहे. विद्यार्थिनीची बोलीभाषा सुधारू शकते अध्ययन-अध्यापन अक्षर शब्द यांच्या ज्ञाना दृढीकरण करणे हाही माझ्या नवोपक्रमाचा उद्देश आहे.

अशा अनेक उपक्रमांमधून

**"माझ्या मराठीची बोलू कौतुके, अमृततेही पैजा जिंके"**

या स्वाभिमानाबरोबरच 'मराठी असे अमुची मायबोली, तिचे पांग आम्ही फेडू आणि शतकानुशतके ती अमृतमय राहील असे अभिवचन पुढच्या पिढीला मी शिक्षक म्हणून देईल. तसे कार्यतत्पर करण्याचा प्रयत्न करीन अशी मी हमी देतो.

सदर नवोपक्रम राबविण्यासाठी मा.मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका सौ सामक मॅडम, पर्यवेक्षिका सौ कुंभार मॅडम, संस्कृत शिक्षिका विजापूरे मॅडम माझे सर्व मराठी सहकारी शिक्षक ,शिक्षिका तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शाळेतील इतर सर्व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले सातारा जिल्हा सावित्रीबाई फुले डी.एड कॉलेजचे प्राध्यापक श्री भोसले सर यांचेही खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले यांचेही मी खूप खूप ऋणी आहे. त्याचप्रमाणे या नवोपक्रमात सहभागी असणारे माझे विद्यार्थी व माझा पालक वर्ग या सर्वांचा मनापासून आभारी आहे.



**९) संदर्भसूची व परिशिष्टे : -**

**अ) संदर्भसूची**


| अ.क्र. | पुस्तकांची नावे | लेखक /प्रकाशन |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम व कृतिसंशोधन | स्वाती गाडगीळ ,सुविचार प्रकाशन मंडळ पुणे |
| २ | कृतिसंशोधन व नवोपक्रम | अरविंद लो.कपोले ,निराली प्रकाशन . |
| ३ | सुलभ शुद्धलेखन | डॉ . द.न . गोखले ,सोहम प्रकाशन,पुणे |
| ४ | मराठी भाषा व साहित्याचे उत्तम अध्यापन | प्रा. श्रीकांत नाईक , अभिनंदन प्रकाशन कोल्हापूर |


**ब) परिशिष्टे**

**अ) विद्यार्थिनींचे यादी -**

| **अ.क्र.** | **विद्यार्थिनींची नाव** | **इयत्ता** |
|---|---|---|
| १ | कु. अडसुळे यशश्री अच्युत | इ. ९ वी |
| २ | कु. चव्हाण मैथिली मिलिंद | इ. ९ वी |
| ३ | कु. चोरगे धनश्री प्रकाश | इ. ९ वी |
| ४ | कु. गवते मुग्धा सुजित | इ. ९ वी |
| ५ | कु. घोडके माधवी विवेक | इ. ९ वी |
| ६ | कु. हिवरे अनुष्का उमेश | इ. ९ वी |
| ७ | कु. जाधव गिरीजा संजय | इ. ९ वी |
| ८ | कु. जगदाळे अदिती अशोक | इ. ९ वी |
| ९ | कु. कदम तन्वी महेश | इ. ९ वी |
| १० | कु. कापरे समिक्षा नितीन | इ. ९ वी |
| ११ | कु. करंदीकर प्राची अवधूत | इ. ९ वी |
| १२ | कु. काटवटे मुग्धा सुधीर | इ. ९ वी |
| १३ | कु. कुंभार कस्तुरी प्रशांत | इ. ९ वी |
| १४ | कु. कुंभार त्रिशा उदय | इ. ९ वी |
| १५ | कु. माळी पियुषा उध्दव | इ. ९ वी |
| १६ | कु. माने अदिती अभिजित | इ. ९ वी |
| १७ | कु. माने साक्षी प्रताप | इ. ९ वी |
| १८ | कु. पाटील दर्शना प्रशांत | इ. ९ वी |
| १९ | कु. पाटील ज्ञानेश्वरी अतुल | इ. ९ वी |
| २० | कु. पाटील प्रांजली प्रकाश | इ. ९ वी |
| २१ | कु. पाटील श्रध्दा अमित | इ. ९ वी |
| २२ | कु. पवार दुर्गा दिपक | इ. ९ वी |
| २३ | कु.पोळ सानवी शशिकांत | इ. ९ वी |
| २४ | कु. रेडेकर वैष्णवी विनोद | इ. ९ वी |
| २५ | कु. शेटे अदिती चंद्रशेखर | इ. ९ वी |
| २६ | कु. सूर्यवंशी प्रज्ञा हेमंत | इ. ९ वी |
| २७ | कु. तावरे इंद्रायणी परशुराम | इ. ९ वी |
| २८ | कु. वळंजू समृध्दी सचिन | इ. ९ वी |
| २९ | कु. वरेकर अदिती सुनिल | इ. ९ वी |
| ३० | कु. यादव प्रगती विकासकुमार | इ. ९ वी |

**ब ) पूर्व चाचणी ( लेखी परीक्षा )**

## नवोपक्रम पूर्व चाचणी ( लेखी परीक्षा ) दि. / /2023

**इयत्ता ८ वी / ९ वी**

विद्यार्थिनीचे नाव : ______________________ एकूण गुण : २०

शाळेचे नाव : स्व.शेठ रामबिलास किसानलाल लाहोटी कन्या प्रशाला,कराड . मिळालेले गुण :

**प्रश्न क्र. १ : शुद्ध शब्द लिहा ?** **गुण ०६**

१) आशिर्वाद ____________ ७) भिती ____________

२) उज्वल ____________ ८) क्रिडांगण ____________

३) परिक्षा ____________ ९) नविन ____________

४) गरिब ____________ १०) जिवन ____________

५) किर्तन ____________ ११) पुनरवसन ____________

६) अंतकरण ____________ १२) अद्भूत ____________

**प्रश्न क्र. २ : दोन्ही शब्द अर्थपूर्ण होण्यासाठी रिकाम्या जागी कोणते अक्षर येईल .** **गुण – ४**

| | | |
|---|---|---|
| न | | न |
| | शा | |
| | ग | |
| | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | स | | |
| रा | | य | ण |
| | म | | |

प्रश्न क्र ३: खालील शुद्ध शब्द ओळखा? **गुण – ५**

1) 1)चिरंजीव 2) चिरंजिव 3) चीरंजीव 4) चीरंजिव ____________

२) 1)निश्कारण 2) निष्कारण 3) नीष्कारण 4) निस्कारण ____________

3) 1) दरोज 2) दरोरोज 3) दररोज 4) दरोरज ____________

4) 1)नियुक्त 2) नियुत्क 3) नीयुक्त 4) नीएक्त ____________

5) 1) सर्वांगिण 2) सर्वांगीण 3) सर्वागीन 4) सरवागीण ____________

प्रश्न क्र ४ : खालील शब्दचा समानार्थी शब्द लिहा . **गुण – ५**

1) अनल - ____________ 6 ) मर्कट - ____________

2) अनर्थ - ____________ 7) मानव - ____________

3) खग - ____________ 8 )सिमा - ____________

4) दीन - ____________ 9) हुशार - ____________

5) प्राचीन - ____________ 10) सेवक - ____________

क ) उत्तर चाचणी ( लेखी परीक्षा )

# नवोपक्रम उत्तर चाचणी ( लेखी परीक्षा )

दि. / /2023

**इयत्ता ८ वी / ९ वी**

विद्यार्थिनीचे नाव : ______________________ एकूण गुण : २०

शाळेचे नाव : स्व.शेठ रामबिलास किसानलाल लाहोटी कन्या प्रशाला,कराड . मिळालेले गुण :

**प्रश्न क्र. १ : शुद्ध शब्द लिहा ?** **गुण ०६**

१)आशिर्वाद ________ ७) उज्वल ________

२ )औपचारीक ________ ८) स्तुति ________

३) निर्वीकार ________ ९) तीर्थविधि ________

४) तज्ञ ________ १०) हुतुतु ________

५) शारिरीक ________ ११) प्रकृति ________

७) फलश्रुति ________ १२) पुनरचना ________

**प्रश्न क्र. २ : दोन्ही शब्द अर्थपूर्ण होण्यासाठी रिकाम्या जागी कोणते अक्षर येईल .** **गुण – ४**

| | | |
|---|---|---|
| | फ | ण |
| र | | |
| स्का | | |
| | | |

१) वि ,र २) ती,र

३) दो,र ४) ति ,र

| | | |
|---|---|---|
| मा | | स |
| | व | |
| | र | |
| आ | | रा |

१)स,व २)स,प

३) स ,व ४) न , स

प्रश्न क्र ३: खालील अशुद्ध शब्द ओळखा? **गुण – ५**

1) 1)उत्कृष्ट 2) विशीष्ट 3) ज्येष्ठ 4)कनिष्ठ ________
२) 1)शारीरीक 2) पीकपाणी 3) सामुदायिक 4)संयुक्त ________
3) 1) गरीब 2) परिक्षा 3) नवीन 4)जीवन ________
4) 1)हाहाःका 2) अधःपतन 3) अंतःकरण 4)मनस्थिती ________
5) 1) दीपावली 2) कीर्तन 3) निर्मित 4) धैर्यशिल ________

प्रश्न क्र ४ : खालील शब्दचा समानार्थी शब्द लिहा . **गुण – ५**

1) राजवाडा - ________ 6 ) सूर्य - ________
2) वारा - ________ 7) अरण्य - ________
3) अरण्य - ________ 8 ) आनंद - ________
4) शरीर - ________ 9) भय - ________
5) तंटा - ________ 10) कनक - ________

**ड ) पदनिश्चयन श्रेणी**

आवर्तन १ घेण्यापूर्वी विद्यार्थिनीच्या सहभागाचे मूल्यमापन पदनिश्चयन श्रेणीद्वारे करण्यात आले .

विद्यार्थिनीचे नाव : मिळालेले गुण : २०

इयत्ता : रोल नं.

( उत्तम :- 3 गुण , चांगला :- २ गुण , साधारण :- १ गुण

शाळेचे नाव : स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड

| **अनु. क्र.** | **उपक्रमाचे नाव** | **खेळातील सहभाग** | | |
|---|---|---|---|---|
| | | **उत्तम** | **चांगला** | **साधारण** |
| १ | चला शुद्ध शब्द ओळखू या. | | | |
| २ | अशुद्ध शब्द ओळखू या. | | | |
| ३ | शुद्ध शब्द ओळखू या. | | | |
| ४ | शब्दनिर्मिती करू या . | | | |
| ५ | शब्द कोडी सोडवूया ? | | | |
| ६ | उच्चारातील फरक ओळखू या . | | | |
| ७ | शुद्ध शब्दपट्ट्या वाचू या . | | | |
| ८ | रोज ५ शब्द लिहू या. | | | |
| ९ | सुभाषित पाठांतर करू या . | | | |
| १० | सुविचार लेखन करू या . | | | |
| ११ | शब्दकोशचा वापर करू या . | | | |

## इ) नवोपक्रमाबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय ............

अभिप्राय

दि. ७ नोव्हें २०२३

'लावू श्रवणाची गोडी, सोडवू शुद्ध शब्दांची कोडी' या नवोपक्रमास इयत्ता ९ अ च्या ३० विद्यार्थिनींनी आमच्या प्रशालेतील मराठी विषयशिक्षक श्री. पुकळे वाय. बी यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. मुख्या. यांच्या प्रेरणेने नवोपक्रमात उत्स्फूर्त सहभाग दिला आहे.

अक्षरांपासून शब्द व शब्दकोडी तयार करून शब्दसंग्रह वाढवण्यासाठी, शुद्ध शब्द - अशुद्ध शब्द ओळखण्याची क्षमता विकसित करण्यासाठी श्री. पुकळे सरांनी आयोजित केलेला नवोपक्रम विद्यार्थिनींची मराठी भाषाभिवृद्धी होण्यासाठी निश्चितच फलदायी ठरेल!

विद्यार्थिनींनी पूर्व चाचणीद्वारे, शुद्ध-अशुद्ध शब्दांच्या ज्ञानाची जाणीव झाली आणि शुद्ध शब्दांचे उच्चार, मूलस्थाने, शब्दांचे वापर करून विविध वाक्ये याची जाणीव भाषाविषयक साहित्याचे श्रवण करून विद्यार्थिनींना झालेली दिसली. विद्यार्थिनींची क्रियाशीलता, कल्पकता वाढलेली दिसली.

शुद्ध शब्दांची शब्दकोडी, सुबक रित्या करून विद्यार्थिनींच्या सृजनशक्तीला वाव देण्याचे काम सरांनी उत्तमरित्या केले आहे.

श्रवण- भाषण- लेखन या क्रमबद्ध कौशल्याद्वारे विद्यार्थिनींचा भाषाविकास साधण्यासाठी श्री. पुकळे सरांनी अतिशय परिश्रम घेतले आहेत.

विद्यार्थिनींना मराठी भाषेची गोडी वाटावी व त्यातूनच शुद्ध शब्दांची पारख व्हावी, यासाठी विद्यार्थिनींची धडपड व श्री. पुकळे सरांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

या नवोपक्रमास अनंत शुभेच्छा!

— सौ. शुभांगी रामचंद्र सामक
उपमुख्याध्यापिका
स्व. शे. रा. कि. लाहोटी कन्या प्रशाला, कराड

---

दि: ७ नोव्हेंबर २०२३

अभिप्राय

मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर वाचनासोबत शुध्दता देखील महत्वाची आहे. वाणी शुध्द होण्यासाठी त्यातील उच्चार जमले पाहिजेत. अनुनासिकांचे उच्चार करता आला पाहिजे. आताच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी भाषेकडे आहे. हे लक्षात घेऊन स्व. शेठ रा. कि. लाहोटी कन्या प्रशालेचे शिक्षक श्री. पुकळे सर यांनी इ. ९ वी 'अ' च्या वर्गासोबत एक नवा उपक्रम राबविला तो म्हणजे 'शुध्द, अशुध्द शब्द कोडी'.

माझी मुलगी कु. वैष्णवी विनोद रेडेकर इ. ९ वी अ या वर्गात शिकते. ती देखील ह्या उपक्रमात सहभागी होती. उपक्रमातील वर्गातील सर्व मुलींना वर्णानुक्रमे अक्षरे वाटून दिली. त्यातून वैष्णवी साठी 'श' हे अक्षर आले. त्यासोबत दिलेल्या अशुध्द शब्दांचे शुध्द शब्द ओळखून / शोधून त्यांचे समानार्थी शब्द शोधणे असा उपक्रम होता. ती हा उपक्रम करीत असताना उत्साही तर होतीच त्याचसोबत नव्या शब्दांच्या ओळखीने आनंदी देखील होती. तिच्या वाणीत उत्तम बदल झालेला दिसून येतो. तिच्याच नव्हे तर वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी मध्ये हा बदल घडून आलाच असेल अशी माझी खात्री आहे.

पुर्व चाचणीतील गुण व उत्तर चाचणीतील गुण यामध्ये प्रगती दिसून आली. याचा उपयोग तिला भविष्यात देखील उत्तम प्रकारे होईल याची हमी मी देऊ शकतो. यासाठी मेहनत घेणारे आदरणीय श्री पुकळे सर यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुंदर व फायदेशीर तसेच यशस्वी झाला आहे यात तिळमात्र शंका नाही.

या उपक्रमासाठी श्री. पुकळे सर व सर्व विद्यार्थिनींना खूप-खूप शुभेच्छा व त्यांचे कौतुक!

V. A. Redekar.

- श्री. विनोद आनंदा रेडेकर
पालक

---

लाहोटी कन्या प्रशालेच्या,उपमुख्यध्यापिका सौ. सामक मॅडम व पालक त्यांचा अभिप्राय .

---

दिनांक- ०७.११.२०२३

अभिप्राय

मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी भाषिक कौशल्ये विकसित झाली पाहिजे. भाषिक कौशल्ये विकसित होण्यासाठी भाषेची शब्दसंपत्ती वाढली पाहिजे आणि त्यासाठी समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शुद्ध अशुद्ध शब्द, एक शब्दाचे भिन्न अर्थ, एका अक्षराने सुरु होणारे अनेक शब्द इत्यादी घटकांचा विकास होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी स्व. शेठ रा. कि. लाहोटी कन्या प्रशालेचे मार्गदर्शक शिक्षक श्री. युवराज पुकळे सर यांनी इयत्ता ९वी अ च्या वर्गात जो उपक्रम राबविला तो म्हणजे 'शुद्ध अशुद्ध शब्दकोडी' होय.

माझी मुलगी कु. समिक्षा नितीन कापरे इयत्ता ९वी अ च्या वर्गात शिकते. तिने या उपक्रमात सहभाग घेतला होता. त्या उपक्रमात समिक्षाला 'ठ' हे अक्षर आले. दैनंदिन जीवनात वाचन कौशल्यासोबत भाषण कौशल्य सुद्धा विकसित व्हावे यासाठी समिक्षाने 'ठ' अक्षराने सुरु होणारे शब्द शोधले. त्या शब्दाचे समानार्थी, विरुद्धार्थी, शुद्ध अशुद्ध शब्दांचा शोध घेतला आणि शुद्ध अशुद्ध शब्दांची कोडी तयार केली. त्यामूळे शब्दसंपत्ती वाढण्यास निश्चित मदत झाली. या उपक्रमात समिक्षाने अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. त्यामूळे तिची संग्रह करण्याची व एखाद्या शब्दाचा अर्थ शोधण्याची वृत्ती जागृत झाली. या उपक्रमामूळे तिच्यात उत्तम बदल घडून आलेला दिसतो.

अशा प्रकारचे भाषिक कौशल्य विकसित करणारे श्री. युवराज पुकळे सर यांच्याकडून उपक्रम करण्याची प्रेरणा तिला मिळाली आहे. भाषेची गोडी निर्माण होऊन, मातृभाषेचे शिक्षणातील महत्त्व तिला समजले आहे. या उपक्रमामध्ये सहभागी असणारी माझी मुलगी समिक्षा व सर्व ९वी अ च्या विद्यार्थीनी व त्यांना मार्गदर्शन करणारे श्री. युवराज पुकळे सर व मुख्याध्यापक यांचे हार्दीक अभिनंदन व पुढील शैक्षणिक कार्यास हार्दीक शुभेच्छा.

श्री. नितीन भागवत कापरे
पालक

---

दि. ७ नोव्हेंबर २०२३

अभिप्राय

मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. तिचे संरक्षण तसेच संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. कारण आपले विचार व्यक्त करण्याचे उत्तम माध्यम म्हणजे मातृभाषा होय. परंतु आज-कालच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी व अन्य भाषांकडे वळत आहे. हेच जाणून घेऊन स्व. शेठ रामविलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशालेचे शिक्षक यांनी इ. ९ अ च्या वर्गामध्ये 'शुद्ध व अशुद्ध' शब्दकोडी हा अत्यंत उपयुक्त तसेच मराठी भाषेवरील विद्यार्थिनींचे प्रभुत्व वाढवण्यासाठी सुंदर उपक्रम यशस्वीरीत्या राबविला.

माझी मुलगी कु. प्रज्ञा हेमंत सूर्यवंशी इ ९वी अ या वर्गात शिकत आहे. या उपक्रमामध्ये सर्व विद्यार्थिनींना वर्णानुक्रम अक्षर वाटून देण्यात आली. माझ्या मुलीला 'त' हे अक्षर आले होते. या अक्षरावरून तिने अनेक शब्द शोधले. शब्द नव्हे तर त्यातील शुद्ध प्रथम अशुद्ध शब्द लक्षात घेऊन ते शुद्ध करून त्यांचे समानार्थी शब्द शोधले.

सर्व विद्यार्थिनींना पूर्व चाचणीद्वारे शुद्ध - अशुद्ध शब्दांच्या ज्ञानाची जाणीव झाली. त्यानंतर विद्यार्थिनींनी शुद्ध शब्दांची शब्दकोडी तयार केली. हा उपक्रम पार पाडताना विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडली. तसेच त्यांचे उच्चार शुद्ध झाले. माझ्या मुलीची शब्द शोधण्याची धडपड पाहून माझे मन भरून आले. या उपक्रमासाठी मेहनत घेणार श्री पुकळे सर यांचे आभार मानावे तितके कमी आहेत.

हा उपक्रम सर्व विद्यार्थीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. तसेच याचा माझ्या मुलीला भविष्यात नक्कीच उपयोग होईल. या उपक्रमासाठी मेहनत घेणारे श्री. पुकळे सर व उपक्रमात सहभागी सर्व विद्यार्थिनींचे खूप खूप कौतुक!!

S. H. Suryawanshi.
सौ. सुषमा हेमंत सूर्यवंशी

-: समाप्त :-